Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

## August - 2025



**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pawan Malpani**
Secretary

## Table of Contents


- Editorial
- Membership
- Birthday & Anniversary
- RI President
- Annapurna Donors
- Dist.Membership Dir.Message
- Lead 2025 photos
- Rotary Information
- Rotary News
- August Projects



मुद्रक :
क्रिएटीव आर्टस अँड ग्राफीक्स
मित्र नगर, खोरी गल्ली, लातूर
9730887221, 9834827710


# संपादकीय मनोगत



प्रिय रोटेरियन बंधूंनो,रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन च्या "दिशा" या मासिक बुलेटिनचा ऑगस्ट अंक आपल्यासाठी सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. या महिन्यापासून आपल्या बुलेटिनच्या नव्या प्रवासाला प्रारंभ होत आहे. आतापर्यंत मासिक स्वरूपात प्रकाशित होणाऱ्या दिशा चा हा अंक विशेष आहे, कारण या महिन्यापासून प्रथमच आम्ही साप्ताहिक अंक प्रकाशित करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. यामुळे रोटरीचे उपक्रम, विचार आणि सदस्यांचा सहभाग अधिक वेगाने व प्रभावीपणे पोहोचविण्याची संधी मिळेल.ऑगस्ट महिना रोटरीसाठी तसेच समाज जीवनासाठीही विशेष मानला जातो. या महिन्यात मैत्री दिन, रक्षाबंधन आणि स्वातंत्र्यदिन यांसारखे स्नेह, नातेसंबंध आणि राष्ट्रभावनेला अधोरेखित करणारे दिवस येतात. त्याचबरोबर आम्ही कृषी विशेषांक देखील समाविष्ट करून शेतकरी बांधवांच्या कार्याला व रोटरीच्या कृषी विषयक धोरणांना उजाळा देण्याचा प्रयत्न केला आहे.आमच्या क्लबच्या प्रत्येक सदस्याच्या सक्रिय सहभागामुळे आणि सहकार्यामुळे दिशाला ही नवी ओळख मिळत आहे. मला खात्री आहे की, आपण सर्व मिळून या बुलेटिनला अधिकाधिक समृद्ध कराल आणि रोटरीच्या सेवाभावी कार्याचा ठसा उमटवाल.आपल्या सूचनांची व सहभागाची नेहमीच अपेक्षा आहे.

आपला,
रो.अमोल बनाळे
संपादक,दिशा बुलेटिन
रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन

### Rotary Disha Editorial Committee



Rtn.Amol Banale



Rtn.Chandrakant Gastgar



Rtn.Pramod Kumbhar



Rtn.Rohit Kulkarni

### Birthdays

- Umakant Madrewar - 2 Aug
- Vaibhav Shaha - 4 Aug
- Jayprakash Soni - 8 Aug
- Pramod Kumbhar - 10 Aug
- Harish Katariya - 15 Aug
- Kishor Datal - 15 Aug
- Ganesh Sawant - 15 Aug



### Birthdays

- Sunil Parandekar - 18 Aug
- Amol Dadge - 25 Aug
- Chandrakant Gastgar - 26 Aug
- Ravi Joshi - 30 Aug
- Rohit Kulkarni - 31 Aug

# Rtn.Francesco Arezzo RI President Message



August is Membership Month, but our commitment to growth and connection is year-round. When we focus on growing Rotary, we grow our ability to serve, to lead, and to bring lasting change.Membership growth isn't just about numbers. It's about opening doors. It's about inviting more people who are ready to give their time, talents, and hearts to a cause greater than themselves. When we welcome new members, we bring in fresh ideas and new energy. We expand our impact, strengthen our clubs, and ensure that Rotary continues to evolve with the world around us.Remember, there is now great flexibility in fashioning nontraditional club models. I'm inspired when I see these innovative clubs thrive by offering new and prospective members more ways to connect and serve.In Korea, the growth of satellite clubs has created opportunities for nearly 1,000 new members to find their place in Rotary. In Romania, the close collaboration between Rotarians, Rotaractors, and Interactors has built a pipeline of future leaders. In India, some Rotarians gather around a shared interest — whether it's professional development or a passion for service — and those connections deepen their commitment and their joy in being part of Rotary. And we've seen cause-based clubs thrive in regions as diverse as Southeast Asia, Africa, and Europe.There's a common thread: Where clubs are growing, membership is a priority and there is a willingness to try something new. Rotary is not limited to one structure or tradition. We are a global network of people of action, and that means there is room for many kinds of clubs, many ways to serve, and many paths into our organization.This spirit of innovation is also guiding our efforts to reach new communities. In places where there has never been a Rotary club — or where a club once existed and faded — Rotarians are finding ways to grow Rotary. They are identifying areas of potential and building clubs that reflect the character and needs of their communities.Every member plays a part in this journey. Whether you introduce a friend to your club, support a new meeting format, reconnect with program alumni, or simply share your Rotary story, you are helping our organization grow stronger and more vibrant.No one owns a Rotary club. It is a gift we pass on to the next generation. When we nurture that gift, when we invite others to share in it, we ensure that Rotary continues to be a force for good.Let's prioritize membership growth — not just in August but every month of the year. Together, through friendship, creativity, and shared purpose, we will grow Rotary and Unite for Good.

**Rtn. Francesco Arezzo**
President,
Rotary International 2025-26

## Thank You Donors
(Annapurna this Month)

**Rtn.Vishal Ayachit**
**Dwij Dinesh Soni**
**Naresh Pedde**



# Secretary Report

- राष्ट्रगीताने बैठकीची सुरुवात
- फोरवे टेस्ट चे  वाचन रो. गिरीष पेन्सलवार यांनी केले.
- साप्ताहिक पत्रव्यवहार- मुखेड येथील पूरग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले.
- मेम्बरशीप ग्रोथ साठी प्रयत्न करण्यात यावे असे डिस्ट्रीक्ट कडुन सांगण्यात आले.
- टिआरएफ साठी आवाहन करण्यात आले.
- चित्रकला स्पर्धा बाबत मिटींग झाली डायरेक्टर व प्रोजेक्ट चेअरमन पुढिल मिटींग मध्ये अहवाल देतील.
- नेशन बिल्डर अॅवार्ड लवकरच प्रोजेक्ट चेअरमन निश्चित करून प्रोजेक्ट लवकरच घेण्यात येईल असे सांगितले
- क्लब बुलेटिन- रो. रोहित  कुलकर्णी यांनी बुलेटिन बद्दल माहिती दिली - साप्ताहिक बुलेटिन चे विमोचन केले. रो. चंद्रकांत बारस्कर यांनी गेस्ट एडीटर म्हणून काम पाहिले. या आठवड्यात स्पॉन्सरशीप अवतारात इंटेरीयर ने दिली असे सांगण्यात आले.
- गणपतीची कार्यशाळा: रो. किशन कुलेरीया यांनी काटगाव येथील वसंतराव नाईक शाळेत गणपतीची कार्यशाळा संपन्न झाली या विषयावर सविस्तर माहिती सांगितली .
- लीड२५ - माजी अध्यक्ष रो. डॉ. राजगोपाल तापडीया यांनी खालील माहिती सांगितली
- रोटरी इंटरनॅशनल अध्यक्ष फ्रान्सिसको अराईझो हे उपस्थित आहेत. २५० करोड च्या सेवा प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले.
- रो.अजय दुडीले यांनी मिटींग मधील उपस्थिती बद्दल चिंता व्यक्त केली.
- रो. विशाल अयाचित यांनी नेत्रदान विषयी माहिती दिली व त्यांनी स्वतः नेत्रदानाया संकल्प केल्या बद्दल सत्कार करण्यात आला.
- रोटरॅक्ट क्लब ऑफ लातूर मिडटाऊन च्या सचिव तनया जटाळ व सदस्य मित दामा हे उपस्थित होते . गणपती चा कार्यशाळा या कार्यक्रमासाठी २४ ऑगस्ट रोजी स्टीम एज्युकेशन येथे यावे असे निमंत्रण दिले.
- रोटरॅक्ट क्लब ऑफ लातूर मिडटाऊन च्या सचिव तनया जटाळ व सदस्य मित दामा यांचे पेन देऊन स्वागत करण्यात आले

**Man of The Meeting**



Rtn.Girish Pensalwar

**1st Come in the Hall**



Rtn.Kishan Kuleria





## रोटरी सदस्य हेच रोटरीचे खरे बळ — रो.सी.ए.नितीन कुदळे



रोटरी म्हणजे सदस्य ? कारण सदस्यच हे रोटरीच्या प्रत्येक सेवा प्रकल्पामागे असलेली खरी प्रेरणा, कल्पकता आणि क्रियाशील शक्ती आहेत. रोटरी इंटरनॅशनलने ऑगस्ट महिना “Membership & New Club Development Month” म्हणून घोषित केला आहे. या महिन्यात जगभरातील सर्व क्लब आणि जिल्ह्यांनी सदस्यसंख्येत वाढ, सदस्यांचे समाधान, आणि नव्या संधी शोधण्यावर भर द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.रोटरीचे सदस्य होणे म्हणजे केवळ क्लब मिटिंगला येणे नाही ते म्हणजे समाजासाठी काहीतरी करण्याची जबाबदारी, वैयक्तिक व व्यावसायिक वाढीस चालना, जगभरातील लाखो रोटेरियन्ससोबत बंध/मैत्री निर्माण करणे, कुटुंबासाठी एक मूल्याधारित पर्यावरण.

रोटरी क्लबने ऑगस्ट महिन्यात असे उपक्रम राबविले त्यामध्ये जुन्या सदस्यांचे सन्मान, अनुभवकथन, गौरव., ‘‘PHF‘‘ मिटिंग, "Guest With Me" प्रत्येक सदस्य एक पाहुणा घेऊन यावा, "My Rotary Story" सोशल मीडिया मोहिम, फॅमिली इन्व्हॉल्वमेंटः कुटुंबासाठी सहल, डिनर, क्रीडा स्पर्धा., तरुणांसाठी माहिती सत्रः रोटरॅक्ट, कॉलेज विद्यार्थी, उद्योजक., महिला सदस्य ओळख सप्ताहः विशेष आमंत्रण व चर्चासत्र, Business Networking Meet : सदस्यांमधील व्यावसायिक सहकार्य वाढवा., सेवा प्रकल्प दर्शनः समाजात सकारात्मक प्रतिमा निर्माण करा., नवीन सदस्यांचे स्वागत व समावेश कार्यक्रम., सॅटेलाईट क्लब/नवीन क्लब स्थापना करणे. सदस्य जोडणे सोपे आहे, पण टिकवून ठेवणे महत्त्वाचे, यासाठीः नियमित संवाद, सहभागी होण्याचे संधी, व्यावसायिक व कौटुंबिक सन्मान, अर्थपूर्ण सेवा प्रकल्प., प्रत्येक क्लबने सदस्य संख्या वाढीचा स्पष्ट आकडा ठरवावा, महिला व युवक सदस्यांवर विशेष भर द्यावा, कमकुवत सदस्यांना पुन्हा जोडण्याचा प्रयत्न करावा (Reconnect), नवीन क्लब किंवा ग्रुप सुरू करण्याचा प्रस्ताव ठेवावा.रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउन हा अनेक अंगांनी मजबूत आहे. सदस्यांचे वाढदिवस, विवाह दिन, कौटुंबिक यश, यावर आधारित कार्यक्रम, व्याख्याने, फॅमिली डिनर मिटिंग्स, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, ट्रिप्स, आणि सामाजिक योगदान यामुळे क्लबमध्ये एक सशक्त कुटुंबवत वातावरण आहे रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउनच्या संपूर्ण टीमचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा...!!.

या वर्षात त्यांनी महिला सदस्य, reconnect , आणि तरुण सदस्य बनविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. रोटरी क्लब ऑफ हा केवळ प्रकल्प राबविणारा क्लब नव्हे, तर एक प्रेरणादायी क्लब आहे.

आपला,
**रो.सी.ए.नितीन कुदळे,**
District Membership
Chair – RID 3132

## रोट्रॅक्ट क्लब ऑफ लातूर मिडटाउन आयोजीत गणपतीची कार्यशाळा ४.०



## Rotary Information

ऑगस्ट महिना  रोटरीचा सदस्यत्व विकास (Membership Development) महिना!
हा महिना आपल्याला एक सुंदर आठवण करून देतो ''आपण रोटरीत आलो तेव्हा कोणी तरी आपल्याला आमंत्रण दिले होते, आता दुसऱ्याला ही संधी द्यायची आहे!
''आजच्या जगात लोकांची जीवनशैली, वेळेचे बंधन आणि आवडीनिवडी वेगळ्या आहेत. अशा काळात रोटरीनेही स्वतःला बदलले आहे  ''प्रत्येकाला सेवा करण्याची संधी''
हा उद्देश साध्य करण्यासाठी आता अनेक प्रकारचे क्लब निर्माण झाले आहेत.
रोटरी क्लबचे विविध प्रकार

१. पारंपरिक (Traditional) रोटरी क्लब-
- आठवड्याला एक मिटिंग, प्रत्यक्ष संवाद आणि फेलोशिपची खरी चव.
- रोटरीच्या समृद्ध परंपरेतून नेतृत्व, मैत्री आणि सेवा यांचा संगम.

२ ई-क्लब (E-Club)-
- मिटिंग्स ऑनलाइन Zoom किंवा Google Meet वर.
- व्यस्त व्यावसायिक, वारंवार प्रवास करणारे आणि परदेशात राहणाऱ्यांसाठी उत्तम.
- ''सेवेचे बंधन वेळेचे नसते'' हे याचे ब्रीद!

३ सॅटेलाइट क्लब (Satellite Club)
- कमी सदस्यसंख्या असलेला, मूळ क्लबच्या छत्राखाली चालणारा क्लब.
- नवीन क्षेत्रात सेवा पेरण्यासाठी उत्तम पर्याय.
- ''लहान रोप मोठे झाड बनते, तसे हे क्लब मोठ्या रोटरीत सामील होतात.''

४ कॉर्पोरेट क्लब (Corporate Club)
- एखाद्या कंपनीतील अधिकारी व कर्मचारी मिळून सदस्य होतात.
- उपक्रम थेट रोटरीशी जोडता येतात.
- ''कंपनीचे यश समाजाच्या सेवेशी जोडणारा पूल.''

५ कौझ-बेस्ड क्लब (Cause-Based Club)
- एखाद्या ठराविक सामाजिक उद्दिष्टासाठी (उदा. पर्यावरण, आरोग्य, शिक्षण) बांधील असलेले सदस्य.
- समान ध्येय, समान आवड आणि केंद्रित सेवा प्रकल्प.
-''जे हृदयात जळते, तेच हातांनी घडते!''

६ पासपोर्ट क्लब (Passport Club)
- कुठेही, कोणत्याही क्लबची मिटिंग अटेंड करण्याची मुभा.
- प्रवासी, स्थलांतरित किंवा वेगवेगळ्या शहरात राहणाऱ्यांसाठी उत्तम.
- ''रोटरी आपल्याबरोबर प्रवास करते.''

सदस्यत्व वाढविण्याचा संदेश:
रोटरी आता प्रत्येकासाठी खुली आहे  वेळेची किंवा ठिकाणाची बंधने नाहीत.प्रत्येकाची क्षमता, आवड व जीवनशैली वेगळी असली तरी रोटरीत आपल्यासाठी जागा आहे.आपण दिलेले एक आमंत्रण, कोणाच्या तरी जीवनात सेवा, आनंद आणि मैत्रीची नवी दुनिया उघडू शकते!
ऑगस्ट महिन्यात चला, नवे विचार, नवे क्लब आणि नवे सदस्य घेऊन रोटरीला अधिक मजबूत, अधिक सशक्त बनवूया!''
"Be the reason someone joins Rotary!"


## New RI President 2026-27




ओलायिंका हकीम बाबालोला यांची २०२६-२७ साठी रोटरी इंटरनॅशनल अध्यक्ष म्हणून निवडओलायिंका हकीम बाबालोला, रोटरी क्लब ऑफ ट्रान्स अमाडी, नायजेरिया यांचे सदस्य, यांची रोटरी इंटरनॅशनलच्या संचालक मंडळाने २०२६-२७ या वर्षासाठी अध्यक्ष म्हणून निवड केली आहे. त्यांचा कार्यकाळ १ जुलै २०२६ पासून सुरू होईल.रोटरी इंटरनॅशनलचे अध्यक्ष-नियुक्त संगकू युन यांनी नुकत्याच झालेल्या कर्करोग उपचारांनंतर आरोग्य पुनर्वसनावर लक्ष केंद्रित करण्यासाठी रोटरीतील जबाबदाऱ्या सोडण्याचा निर्णय घेतल्यानंतर, मंडळाने संस्थेचा नवा नेता निवडण्यासाठी विशेष अधिवेशन घेतले.बाबालोला यांनी आपला रोटरी प्रवास १९८८ मध्ये रोटरॅक्टर म्हणून सुरू केला. सहा वर्षांनी त्यांनी रोटरी क्लब ऑफ  ट्रान्स अमाडी मध्ये प्रवेश केला. त्यांच्या नेतृत्वाच्या भूमिकांमध्ये जिल्हा राज्यपाल (२०११-१२), रोटरी इंटरनॅशनल उपाध्यक्ष (२०१९-२०) आणि संचालक मंडळ सदस्य (२०१८-२०) यांचा समावेश आहे. तसेच, त्यांनी एंड पोलिओ नाऊ काउंटडाऊन टू हिस्टरी कॅम्पेन कमिटी (२०१७-२३) आणि नायजेरिया नॅशनल पोलिओप्लस कमिटी (२०१३ पासून सदस्य, २०१६ पासून सल्लागार) यासारख्या समित्यांमध्ये सक्रिय नेतृत्व केले आहे. ते व्यवसायाने वकील असून १९८८ मध्ये त्यांनी अभियांत्रिकीची पदवी घेतली. तेल आणि वायू उद्योगात २५ वर्षे वरिष्ठ पदांवर काम करत त्यांनी शेल पीएलसी सोबत चार खंडांवर प्रकल्प केले आहेत. ते दोन कंपन्यांचे संस्थापक आहेत  रिव्हिएरा सर्व्हिसेस लिमिटेड (तेल व वायू पायाभूत सुविधा कंपनी) आणि लीड अँड चेंज कन्सल्टिंग (एक्झिक्युटिव्ह कोचिंग व संस्थात्मक कार्यक्षमता सल्लागार कंपनी).त्यांच्या व्यावसायिक संस्थांमध्ये नायजेरियन सोसायटी ऑफ  इंजिनियर्स, इन्स्टिट्यूट ऑफ  सेफ्टी प्रोफेशनल्स आणि असोसिएशन ऑफ  चेंज मॅनेजमेंट प्रॅक्टिशनर्स यांचा समावेश आहे. तसेच ते जेरीको बिझनेस क्लब चे सदस्य आहेत, जे स्थानिक सरकारला आर्थिक व सामाजिक धोरणांवर सल्ला देते.बाबालोला आणि त्यांची पत्नी प्रेबा हे पोर्ट हार्कोर्ट येथे राहतात. ते रोटरी फाउंडेशन नावाने स्थापन केलेल्या निधीद्वारे व आर्च क्लम्प सोसायटी सदस्य म्हणून पाठिंबा देतात. तसेच ते शेल्टरबॉक्स यूके चे विश्वस्त आणि सेफ ब्लड आफ्रिका प्रकल्पाचे संचालक आहेत. त्यांना आफ्रिका सेंचेनियल हिरोज अवॉर्ड, रीजनल सर्व्हिस अवॉर्ड फॉर अ पोलिओ-फ्री वर्ल्ड, आरआय सर्व्हिस अबव्ह सेल्फ अवॉर्ड, तसेच द रोटरी फाउंडेशन सिटेशन फॉर मेरिटोरियस सर्व्हिस मिळाले आहेत.रोटरी इंटरनॅशनलचे अध्यक्ष एक वर्षाचा कार्यकाळ बजावतात. ते संचालक मंडळाचे नेतृत्व करतात, संस्थेला प्रेरणादायी दिशा देतात आणि जागतिक स्तरावर रोटरीचे मूल्य पोहोचवतात. जगभरातील क्लबना भेट देऊन रोटरीचे प्रवक्ते म्हणून ते प्रमुख कार्यक्रमामध्ये प्रतिनिधित्व करतात. रोटरी आपले अध्यक्ष अशा सदस्यांमधून निवडते ज्यांनी क्लब अध्यक्ष, जिल्हा राज्यपाल आणि संचालक मंडळ सदस्य अशा नेतृत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.

# Lead 2025 - Chennai





















## New

- 250 Rotary Club
- 250 Rotaract Club
- 250 Interact Club
- 250+Cr Service Projects

# Rotary Mid-Town August Projects



रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन व
रो.चंद्रप्रकाश अग्रवाल यांच्या पुढाकाराने
वृक्षारोपण संपन्न झाले



## विजयोत्सव २०२४-२५





माजी मुख्यमंत्री स्व.विलासरावजी देशमुख यांच्या पुण्य स्मरणार्थ रो.डॉ. अशोक पोद्दार यांच्या पुढाकाराने पोद्दार हॉस्पीटल व रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने अस्थिरोग तपासणी शिबीराचे आयोजन







गणपतीची कार्यशाळा:
काटगाव येथील वसंतराव नाईक शाळेत
गणपतीची कार्यशाळा संपन्न
डॉ. गिरीष कुलकर्णी यांचे मार्गदर्शन




## अभिनंदन - रो.दिनेश सोनी

उज्जैन येथे Global Spiritual Tourism
Conclave मध्ये वक्ता म्हणून सहभागी होण्याची संधी मिळाली

## आगामी आकर्षण

- नेशन बिल्डर अवॉर्ड – सप्टेंबर
- भव्य चित्रकला स्पर्धा – सप्टेंबर
- अन्नपूर्णा – सप्टेंबर
- आर्थिक मदतीसाठी नाटक – डिसेंबर